**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

# कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, पुणे

# कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा भरती परीक्षा-२०१९

शासनाच्या जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या **एकूण ५०० पदांच्या** भरतीकरीता विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, पुणे यांचे वतीने प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा फक्त www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in आणि https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा परीक्षा महाराष्ट्रातील पुणे/मुंबई-ठाणे /नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक या ६ विभागातील शक्यतो खालील जिल्हामध्ये घेण्यात येईल. उमेदवारांची नोंदणी संख्या पाहून जिल्ह्यांची यादी व परीक्षा केंद्र अंतिम करण्यात येईल.

(१) अहमदनगर (२)अकोला (३) अमरावती (४) औरंगाबाद (५) बीड (६) भंडारा (७) बुलढाणा (८) चंद्रपूर (९) धुळे (१०) गडचिरोली (११) गोंदिया (१२) हिंगोली (१३) जळगांव (१४) जालना (१५) कोल्हापूर (१६) लातुर (१७) मुंबई शहर (१८) मुंबई उपनगर (१९) नागपूर (२०) नांदेड (२१) नंदुरबार (२२) नाशिक (२३) उस्मानाबाद (२४) परभणी (२५) पुणे (२६) रायगड (२७) रत्नागिरी (२८) सांगली (२९) सातारा (३०) सिंधुदूर्ग (३१) सोलापूर (३२) ठाणे (३३) वर्धा (३४) वाशिम (३५) यवतमाळ (३६) पालघर.

*** परीक्षेचे वेळापत्रक ***

| प्रक्रिया | दिनांक |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक २५/०७/२०१९ पासुन ते दिनांक १५/०८/२०१९ (रात्री ११.५९ वा. पर्यंत) |
| परिक्षेच्या वेळापत्रकाचा तपशील महापरीक्षा पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल. | |

१) भरती प्रक्रिया संबंधीत सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल सूचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

२) पदनाम :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित)

**वेतनश्रेणी (सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर) :- एस-१४ : ३८६००-१२२८००**

**उपलब्ध पदसंख्या :- एकूण ५०० पदे**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.व.शै. मागासवर्ग (एसईबीसी) | आ.दु.घ. (ईडब्लूएस) | एकूण मागासवर्ग | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | **५०** | **२०+ १०*** | **६** | **८** | **१६** | **६** | **६** | **९०** | **६५** | **५०** | **३२७** | **१७३** | **५००** |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३२ | १९ | ४ | ६ | १० | ४ | ४ | ५९ | ४३ | ३२ | २१३ | ११० | ३२३ |
| महिला (३०%) | १५ | ९ | २ | २ | ५ | २ | २ | २७ | १९ | १५ | ९८ | ५२ | १५० |
| खेळाडू (५%) | ३ | २ | ० | ० | १ | ० | ० | ४ | ३ | ३ | १६ | ९ | २५ |
| अनाथ (१%) खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| दिव्यांग | एकूण पदे-२० (१) चलनवलन विषयक विकलांगता-एकूण-१० पदे (५ पदे OL (One leg Affected) व ५ पदे OA(One Arm Affected) (२) श्रवणशक्तीतील दोष (HH)- १० | | | | | | | | | | | | |
| | * अनुशेषाची पदे | | | | | | | | | | | | |

३) स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.त्याचप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील गुणानुक्रमानुसार पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल. सदरील पद भरती प्रक्रियेसंबंधात वाद, तक्रारी उद्भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, पुणे यांना राहतील.

४) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच भरावी. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचुक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी झाल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही.

५) शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दिनांक ०५/०६/२०१४ नुसार गट-ब (अराजपत्रित) मधील कोणत्याही पदासाठी मुलाखत (मौखिक परीक्षा) घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीकरीता पडताळणी समितीकडे उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

६) **शैक्षणिक पात्रता :-**
उमेदवाराची खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

६.१ माध्यमित शालांत परिक्षा उत्तीर्ण व

६.२ सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाटबंधारे विभाग यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) पदांचे सेवाप्रवेश (सुधारणा) नियम १९९८ नुसार शासनमान्य तीन वर्षे कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका (Diploma in Civil Engineering) अथवा "अंशकालिन" किंवा "दूरशिक्षण पदविका" म्हणजे तीन वर्षे कालावधीच्या स्थापत्य अभियांत्रिकी पदविकेशी समतुल्य आहे अशी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी मान्यता दिलेली पदविका.

"समतुल्य अर्हता" यामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या खालीलप्रमाणे पदविका (कालावधी ३ वर्ष)

- सिव्हील व रूरल इंजिनिअरिंग मधील पदविका
- सिव्हील व रूरल कन्स्ट्रक्शन मधील पदविका
- ट्रान्सपोर्टेशन मधील पदविका
- कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील पदविका

७) **वयोमर्यादा :-**

७.१ जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास उमेदवाराने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असावी व कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष राहील.

**७.२ कमाल वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-**

७.२.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. (वयाच्या ४३ वर्षापर्यंत)

७.२.२ विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षापर्यंत.

७.२.३ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. (वयाच्या ४३ वर्षापर्यंत)

७.२.४ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

७.२.५ वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एक सवलत (अधिकतम) लागू होईल.

**८) ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | | इंग्रजी | मराठी | सामान्यज्ञान | बुध्दीमत्ता चाचणी | तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षा कालावधी | नकारात्मक गुणांकन | काठिण्य पातळी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सरळसेवा गट-ब (अराजपत्रित) | प्रश्नपत्रिका भाषा | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी | १०० | २०० | ९० मिनिट | नाही | मध्यम |
| | | प्रश्न संख्या | १० | १० | १० | १० | ६० | | | | | |
| | | पातळी (दर्जा) | माध्य. शालांत परीक्षा | माध्य. शालांत परीक्षा | माध्य. शालांत परीक्षा | माध्य. शालांत परीक्षा | पदविका | | | | | |

८.१ व्यावसायिक ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या पदविका परीक्षेच्या दर्जासमान राहील. सदरहू व्यावसायिक ऑनलाईन परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.

| अभ्यासक्रम | | |
|---|---|---|
| 1 | **Section name - English** | |
| | | SIMILAR WORDS, OPPOSITE WORDS, COMMON VOCABULARY, SENTENCE STRUCTURE , GRAMMER USE OF IDIOMS AND PHRASES AND THEIR MEANING AND COMPREHENSION OF PASSAGE |
| 2. | **Section name- Marathi** | |
| | | समानार्थी शब्द,विरुध्दार्थी शब्द तसेच सर्वसामान्य शब्दसंग्रह ,वाक्यरचना,व्याकरण,म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| 3. | **Section Name- General Knowledge** | |
| | | चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषत: महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा भूगोल,भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राज्यव्यवस्था तसेच पर्यावरण |
| 4. | **Section name-Logical Ability** | |
| | | (Reasoning Test) उमदेवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न |
| 5. | | **CIVIL ENGINERING (DIPLOMA LEVEL)** |
| | | Building Contruction & Materials, Mechanics, Strength of materials, Theory of structures, Structural analysis and Steel Structures,Concert technology,Design of Reinforced Concert Structures, Pre-stressed Concrete Construction Planning and Management, Surveying, Estimating, Costing and Valulation Irrigation Engineering,Hydraulics & Fluid Mechanics, Geo - technical Engineering, Transportation & Highway Engineering, Docks, Harbours and airports Environmental Engineering. |

**९) परीक्षा शुल्क :**

९.१ खुला प्रवर्ग :- रू. ५००/-

९.२ मागासवर्गीय प्रवर्ग :- रू. ३००/-

उमेदवार आपल्या सोईनुसार भरणा करू शकतात. भरणा करण्याकरीता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत. (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / इंटरनेट बँकिंग/ भीम UPI)

**१०) अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि सूचना :-**

१०.१ उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट

नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. ( Activation लिंक ही 2 दिवसांकरिता activate असेल.). उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल

**टीप** : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

१०.२ उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

१०.३ छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .)

१०.४ पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी.

१०.५ त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.

उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी.

१०.६ ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

१०.७ तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

१०.८ शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल.

१०.९ एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१०.१० आता उमदेवारास पदाची निवड करावी लागेल.

| Sr.No. | Post Name in English | Post Name in Marathi |
|---|---|---|
| 1 | Junior Engineer (civil), Group 'B' Non-Gazetted | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) गट - ब अराजपत्रित |

१०.११ त्यानंतर उमेदवारास कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदासाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.

१०.१२ उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास , उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल.

१०.१३ उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेट बँकिंग, क्रेडिट कार्ड /डेबिट कार्ड, भीम UPI ) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

१०.१४ ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस ११.५९ PM नंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

१०.१५ जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.

**नोंद** :- नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान1/2/3, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशील इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**११) अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन :-**

११.१ युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

११.२ अर्ज प्रिंट करण्यासाठी "**प्रिंट प्रिव्ह्यू**" या पर्यायावर क्लिक करा.

**नोंद**:उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वत: जवळ ठेवावा.

**१२) महत्वाच्या सूचना :-**

१२.१ उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

१२.२ परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय कारणांसाठी सुद्धा किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

१२.३ उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.

१२.४ उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

१२.५ उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही .

**१३) सर्वसाधारण सूचना :- (कार्यपध्दती, अटी व शर्ती)**

१३.१ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरून विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रूपरेषा/वेळापत्रक/परीक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब, सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची

माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करून घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

१३.२ ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

१३.३ उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरीही त्यांनी / तिने या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

१३.४ निवडीच्या कोणत्याही टप्यावर (निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३.५ उमेदवारास ऑनलाईन परीक्षा व कागदपत्रे पडताळणीकरीता तसेच व्यावसायिक चाचणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

१३.६ ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परीक्षेचे प्रवेश पत्र (www.mahapariksha.gov.in) वर उपलब्ध राहील. परीक्षेचे प्रवेश पत्र स्वत: डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

१३.७ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले खालीलपैकी कोणतेही एक ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.

(अ) मूळ पॅन कार्ड (Original Pan Card)
(ब) मूळ पासपोर्ट (Original Passport)
(क) मूळ वाहन अनुज्ञप्ती (Original Driving Licence)
(ड) मूळ मतदार ओळखपत्र (Original Voter ID)
(इ) मूळ फोटोसह राष्ट्रीयकृत बँक अद्ययावत पासबुक (Original Nationalized Bank updated passbook with photo attached)
(ई) मूळ आधारकार्ड (Original Aadhar Card)

उमेदवाराने स्वत: डाऊनलोड केलेले प्रवेशपत्र निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करून ठेवणे आवश्यक आहे. तसेच ऑनलाईन परीक्षा समाप्तीनंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार नाही.

१३.८ उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल.

१३.९ सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, कनिष्ठ

अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती तथा मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**१४) नेमणूकीच्या सर्वसाधारण अटी :-**

१४.१ उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमीसाईल प्रमाणपत्र धारण करणे बंधनकारक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

१४.२ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१४.३ विहीत वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे. अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. त्याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

**१५) आरक्षण :-**

**१५.१ मागासवर्गीय आरक्षण :-**

१५.१.१ विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग या मधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले अलिकडचे / नवीनतम मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१५.१.२ शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक:बीसीसी-२०११/प्र.क्र.२६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये ज्या उमेदवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे. अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमदेवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील.

१५.१.३ विजा (अ), भज (ब), भज(क) व भज(ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

१५.१.४ **सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी)उमेदवारांकरीता** शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर २०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक: सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (ईएसबीसी) आरक्षणाकरीता ग्राह्य धरण्यात येतील.

१५.१.५ **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: राधाओ-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

## १५.२ महिलांसाठी आरक्षण :-

१५.२.१ महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१, म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमाक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५.२.२ खुला (महिला) आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांनी महिलांसाठीच्या राखीव पदाकरीता अर्ज करताना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले अलिकडचे / नवीनतम मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) ऑनलाईन अर्ज भरण्याचे अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निवड रद्द करण्यात येईल. महिला आरक्षणाच्या लाभार्थी उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्फत करणे आवश्यक राहील.

१५.२.३ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

## १५.३ खेळाडूंसाठी आरक्षण :-

१५.३.१ शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै २०१६ शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६ तसेच शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च २०१९ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१५.३.२ शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च २०१९ मधील तरतुदीनुसार खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे संबंधित उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्या कडून प्रमाणित केलेली असणे बंधनकारक राहील.

१५.३.३ शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६ मधील तरतुदीनुसार खेळाडू आरक्षणाकरीता क्रिमीलेअरची अट लागू राहणार नाही. तसेच त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

## १५.४ अनाथ व्यक्तींचे आरक्षण :-

१५.४.१ शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांक:अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक २ एप्रिल २०१८ मधील तरतुदीनुसार अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करताना उमेदवाराकडे, महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमेदवाराने कागदपत्र छाननीचेवेळी पडताळणी समितीस उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या उमेदवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने / तिने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची तपासणी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांचेमार्फत करणे आवश्यक राहील.

१५.४.२ शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांक:अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक २ एप्रिल २०१८ मधील तरतुदीनुसार अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातुन गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

## १५.५ अपंग (विकलांग) आरक्षण :-

१५.५.१ शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, निर्णय क्रमांक:अपंग-२०१०/प्र.क्र.३७५/सेवा-४, दिनांक ११ जानेवारी २०११ मधील तरतुदीनुसार श्रवणशक्तीतील दोष (HH) व चलनवलन विषयक

विकलांगता (OL, OA) या प्रकारच्या पात्रतेचे निकष धारण करणारे दिव्यांग उमेदवार गुणवत्तेनुसार शिफारशीसाठी पात्र असतील.

१५.५.२ विकलांग प्रवर्गातील उमेदवाराचे विकलांगतेचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, निर्णय क्रमांक: अप्रवि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ०६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१५.५.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/ प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

१५.५.४ दिव्यांग आरक्षणाबाबत शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**अपंग उमेदवारांना लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत :-**

- अर्जदाराला लेखनिकाची आवश्यकता असल्यास तशी विनंती आपल्या अर्जामध्ये करावी लागेल.
- उमेदवारास लेखनिकाची सोय स्वत: करावी लागेल.
- उमेदवाराने अर्जामध्ये विनंती केली असल्यास प्रवेश पत्रासोबत (हॉल तिकीट) उमेदवारास लेखनिक घोषणापत्र (Scribe declaration form) मिळेल. उमेदवारास लेखनिक घोषणापत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून ते प्रमाणित करून परिक्षेला आणावे लागेल.
- लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवारास नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाला जादा कालावधी दिला जाईल.
- प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहीण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि अनुग्रह कालावधीची आवश्यकता याबाबत उमेदवाराने अर्ज भरतेवेळी मागणी केली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**१५.६ समांतर आरक्षणाबाबत** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही२०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/ प्र.क्र.३९/ १६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१५.७ शासकीय निमशासकीय कर्मचारी** :- यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

**१५.८ समानगुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य** :- शासन, सामान्य प्रशासन विभाग, पूरकपत्र क्र.प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ०२/१२/२०१७ मधील तरतूदींनुसार लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास "कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य" म्हणून पात्र ठरविल्याबाबतचा पुरावा साक्षांकित प्रतीसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

**१६) अंतिम निवड :-**

१६.१ महापरीक्षा पोर्टलवर फक्त उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत प्राप्त केलेले गुण दर्शविण्यात येतील. गुणवत्ता यादी किंवा निवड यादी जलसंपदा विभागामार्फत तयार करण्यात येईल.

१६.२ उमेदवाराची अंतिम निवड ही ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

१६.३ एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१५/प्र.क्र.(२५५/१५)/१३-अ, दिनांक ०५ ऑक्टोबर २०१५ आणि शासन पुरकपत्र क्रमांक: प्रानिमं-१२१७/प्र.क्र.(९२/१७)/१३-अ, दिनांक ०२ डिसेंबर २०१७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे उमेदवारांची निवडयादी केली जाईल.

**१७) इतर अटी :-**

१७.१ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील (१) पुणे (२) मुंबई (३) नागपूर (४) अमरावती (५) औरंगाबाद (६) नाशिक या महसुली विभागांतर्गत कोठेही नियुक्ती देण्यात येईल. "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" दिनांक २८/०४/२०१५ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१७.२ शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम-२००५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील निर्देशानुसार बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

१७.३ नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

१७.४ वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४]आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" या नावाने लागु होईल.

१७.५ सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१ जुलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ,ब,क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून **विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे अनिवार्य** आहे.

१७.६ शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत **वैद्यकिय दृष्ट्या सक्षम असल्याचे** जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

१७.७ शासकीय सेवेमध्ये संबंधीत उमेदवाराची नियुक्ती त्याचे **पूर्वचारित्र्य व वर्तणूक** (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा **तपासणी अहवाल** आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही व अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक चापअ-१०१२/ प्र. क्र. ६३/ १६-अ दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ नुसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच, यापूर्वीच संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल.

१७.८ मराठी/हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक: माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१७.९ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई -३२, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांका पासून 2 वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा.

१७.१० शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास धारण केलेली असणे अनिवार्य आहे. त्यांनतरची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

## १८) विशेष सूचना :-

१८.१.१ उमेदवारांना महापरीक्षा पोर्टलवर मॉक टेस्ट (Mock Test) साठी एक लिंक पुरविण्यात येईल. त्यावर त्यांनी परिक्षेचा सराव करावा.

१८.१.२ ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा उमेदवाराने मागितलेले सामाजिक / समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिल करणे इत्यादी बदल / सवलती नामंजूर करण्यात येतील.

१८.१.३ परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१८.१.४ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल.

१८.१.५ जाहिरातीत नमूद केलेले सर्व शासन निर्णय / अधिसूचना / शासन परिपत्रके ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच महापरीक्षा पोर्टलचे संकेतस्थळावर लिंक करण्यात आलेले आहेत.

दिनांक : २२/०७/२०१९
ठिकाण : पुणे

(बा.ज.गाडे)
सदस्य सचिव
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)
राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती,
तथा अधीक्षक अभियंता व संचालक,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय
पुणे 411 001.